MHPU120008512022

एस.सी.सी.क्र. ३८६ /२०२२ मधील निशाणी ५ वरील आदेश

फिर्यादीने प्रस्तुतचा अर्ज निगोशियेबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्टचे कलम १४३ अ अन्वये वादातील चेकच्या २० टक्के रक्कम इंटेरियम काम्पेनसेशन म्हणून फिर्यादीस मिळणेबाबत दाखल केला आहे.

०२. अर्जात असे नमुद केले आहे की, सदर कामी निगोशियेबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्टचे कलम १४३ अ मध्ये आलेल्या नवीन दुरुस्तीनुसार सदर आरोपी यांनी चेकच्या रकमेच्या २० टक्क्यापर्यंत रक्कम इंटेरियम कॉम्पेनसेशन हे मे. कोर्टात जमा करणे अनिवार्य आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादातील चेकची रक्कम रुपये २,५०,०००/- असे त्याचे २० टक्के म्हणजेच रक्कम रुपये ५०,०००/- ही आरोपी यांनी कोर्टात भरणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्ज दाखल करुन फिर्यादीने सदर रक्कम रुपये ५०,०००/- ही आरोपीने कोर्टात भरणेबाबत आदेश व्हावा व सदर रक्कम इंटेरियम कॉम्पेनसेशन म्हणून फिर्यादीस देण्याबाबत हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत नि.५ च्या अर्जावर आरोपीने म्हणणे दाखल केलेले नाही सबब, सदर अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला आहे.

०४. फिर्यादी व आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण आरोपीविरुध्द निगोशियेबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये

दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरणात नि.क्र. ३ अ.क्र. १ वर वादातील धनादेश दाखल आहे. सदर धनादेशांचे अवलोकन केले असता आरोपीने सदर धनादेश क्र. ९२८०२३ दिनांक २०/०४/२०२२ रोजी रक्कम रुपये २,५०,०००/- चा फिर्यादी प्रकाश बबन बांदल यांच्या नावाने दिलेला आहे.

०५. आरोपीविरुध्द दि.०९/०३/२०२३ रोजी संपरिक्षा चालविण्यासाठी अपराध तपशील नोंदविला आहे तर सदरचा अर्ज हा दि.०६/०९/२०२२ रोजीचा आहे. त्यामुळे सदर प्रकरणात आरोपीने गुन्हा नाकबुल केलेला आहे. ज्या दिवशी अपराध तपशील आरोपीला समजावून जबानी नोंदवली त्यादिवशी कलम १४३ (अ) हा लागू होता त्यामुळे फिर्यादीचा अर्ज कायदेशीर आहे.

०६. निगोशियेबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्टचे कलम १४३ अ अन्वये वादातील धनादेशाच्या २० टक्के रक्कम ही आरोपीने न्यायालयात भरणेबाबत आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी वादातील धनादेश हा आरोपीने फिर्यादीस दिलेबाबत दिसून येत आहे. सदर प्रकरण बनावट आहे किंवा कसे तसेच आरोपी हे फिर्यादीस कायदेशीर देणे लागतो किंवा कसे हे पुराव्याअंती निष्पन्न होणार आहे. सद्यपरिस्थितीत निगोशियेबल इन्स्ट्रयुमेंट ॲक्टचे कलम १४३ अ अन्वये वादातील धनादेश रक्कम रुपये २,५०,०००/- च्या २० टक्के रक्कम म्हणजेच रक्कम रुपये ५०,०००/- इंटेरियम कॉम्पेन्सेशन म्हणून आरोपीने न्यायालयात जमा करणेबाबत आदेश करणे न्यायोचित ठरणार आहे. यदाकदाचित फिर्यादी आरोप सिध्द करण्यात अपयशी ठरले तर सदरची इंटरियम कॉम्पेन्सेशन रक्कम परत मिळण्यास नियमाप्रमाणे आरोपी पात्र राहणार आहेत. प्रस्तुत प्रकरणाचा निकाल लागण्यास अवधी लागणार आहे. सबब, वरील कारणमिमांसेला सद्दविवेकाला धरुन, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा नि.क्र. २१ चा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. आरोपीने वादातील धनादेश रक्कम रुपये २,५०,०००/- च्या २० टक्के रक्कम म्हणजेच रक्कम रुपये ५०,०००/- इंटेरियम कॉम्पेन्सेशन म्हणून न्यायालयात जमा करावी.

३. सदरची रक्कम आरोपीने न्यायालयात आदेशापासून तीन महिन्याच्या आत जमा करावी.

दिनांक : १७/०४/२०२५

(नेहा कों. नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोर, जि. पुणे.